जा.क्र.पोआ/ ४८३५/२०२१
पिंपरी चिंचवड
दिनांक २१.०४.२०२१

**विषय :- कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग साखळी तोडण्यासाठी "(Break The Chain)" प्रतिबंधात्मक**

**आदेश...**

**संदर्भ :** - १) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्रं.३५/१८ (रा.व का.) दिनांक ०७.०४.२०२०
२) मा.विभागीय आयुक्त (पिंपरी चिचंवड) कार्या.क्रासा.प्र.१/आर आर/१०२४/२०२० यांचे दिनांक २८.०८.२०२० रोजीचे पत्र
३) अधिसुचना सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय मुंबई, क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-०५,दिनांक १४ मार्च २०२०
४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६) महाराष्ट्र शासन आदेश क्र. महसुल व वन विभाग (**DMU/2020/CR.92/DISM,1**) दिनांक १३ एप्रिल २०२१
७) पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्रं.वैद्य/०९/कावि/१३२१/२०२१, दिनांक २०.०४.२०२१

-----ooo-----

ज्याअर्थी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात निर्बंध शिथील व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (मिशन बिगिन अगेन) आणि कोरोना विषाणु संसर्ग साखळी तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) संदर्भात कोविड-१९ या विषाणुच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी सदर अधिनियमांअतर्गत राज्यात कोरोना विषाणुमूळे उदभवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अमलात आलेले आहेत. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड-१९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड आयुक्तलयाच्या क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना प्राधिकृत केलेले आहेत. साथरोग अधिनियम १९८७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी कृष्ण प्रकाश पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पिंपरी चिंचवड** आयुक्तालयाच्या संपुर्ण कार्यक्षेत्रामध्ये दिनांक २०.०४.२०२१ रोजी रात्री ०८.०० पासून ते १ मे २०२१ सकाळी ०७.०० वाजेपर्यंत खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

**१.** पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रासाठी दिनांक १४.०४.२०२१ रोजीचा आदेशातील आवश्यक सेवा (Essential Category) मध्ये खालील नमूद दुकाने सकाळी ०७.०० ते ११.०० या वेळेतच सुरु राहतील.

- सर्व प्रकारची किराणा माल (Groceries) भाजीपाला दुकाने, फळविक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, सर्व प्रकारची खाद्यपदार्थ दुकाने (फक्त क्षेत्रिय अधिकारी, पिंपरी चिंचवड मनपा यांनी प्राधिकृत केलेली) चिकन, मटण, मासे आणि अंडी विक्री करणारी दुकाने
- कृषी संबधित दुकाने आणि त्यांचेशी संबंधित आस्थापना (बियाणे, खते, उपकरणे व त्यांचेशी निगडीत देखभाल व दुरुस्ती सेवा इत्यादी)
- पीव प्राणी खाद्याची दुकाने (Pet Shop)
- पावसायाच्या हंगामातीकरीता नागरीक अथवा संस्थासाठी साहित्याची निर्मिती करणारी दुकाने.
- उर्वरित आवश्यक सेवा (Essential Category) या दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या आदेशानुसार सुरु राहतील.

**२.** वरील नमूद सर्व दुकाने / आस्थापनामार्फत घरपोच पार्सल सेवा सोमवार ते शुक्रवार सकाळी ०७.०० ते संध्याकाळी ०६.०० पर्यंत सुरु राहतील.

**३.** वरील नमूद दुकाने वगळता इतर बाबींसाठी इकडील दिनांक १४.०४.२०२१ व दिनांक १७.०४.२०२१ रोजीचे अरदेश कायम राहतील.

**४.** संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

केंद्र सरकार /महाराष्ट्र शासन /पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि या कार्यालयाव्दारे यापूर्वी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

कोव्हिड १९ च्या प्रतिबंधासाठी केंद्र सरकार / महाराष्ट्र शासन / जिल्हाधिकारी कार्यालय / पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि या कार्यालयाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन करणा-या व्यक्तींवर आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतील दंड संहितेचे कलम १८८ नुसार, साथीचेरोग नियंत्रण कायदा व अन्य कायदेशिर तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश दिनांक २०.०४.२०२१ रोजी पासून पुढील आदेशापर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात लागू राहतील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक २१.०४.२०२१ रोजी दिलेला आहे.

**(कृष्ण प्रकाश)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
**दिनांक :-** **२१**.०४.२०२१